श्री.गणेश बाबासाहेब ढाकणे, सेवानिलंबित ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत-सुसरे, ता.पाथर्डी यांचे गैरवर्तनाबाबत विभागीय चौकशी सुरु करणेकामी चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नेमणूक करणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/४९२/२०२६
दिनांक - स्वाक्षरी खाली नमूद केलेप्रमाणे

संदर्भ- १ .या कार्यालयाचे सेवानिलंबन आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/३८३/२०२६,दि.२७/०८/२०२६.
२.या कार्यालयाचे ज्ञापन दोषारोप क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/४४९/२०२६,दि.१३/१०/२०२६.
३.श्री.गणेश बाबासाहेब ढाकणे,सेवानिलंबित ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत-सुसरे,ता.पाथर्डी दि.१४/१०/२०२६ ची ज्ञापन पोहोच.
४.महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) १९६४ मधील नियम (६)(३)
५.सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र.विचौ-१/प्र.क्र.४५/१३२५-वशिअ,मुंबई दिनांक २५ एप्रिल २०२५

ज्याअर्थी, श्री.गणेश बाबासाहेब ढाकणे,सेवानिलंबित ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत-सुसरे,ता. पाथर्डी येथे कार्यरत असताना गैरवर्तन केल्याने त्यांचे विरुध्द संदर्भ क्र.२ अन्वये एकुण ०५ दोषारोप ठेवण्यात आले होते. संदर्भ क्र.३ नुसार श्री.गणेश बाबासाहेब ढाकणे,सेवानिलंबित ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत-सुसरे, ता.पाथर्डी यांचे दि.१४/१०/२०२६ रोजीची ज्ञापन पोहोच प्राप्त असून ज्ञापन दोषारोपाचा खुलासा सादर केला नाही.

सबब, श्री.गणेश बाबासाहेब ढाकणे,सेवानिलंबित ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत-सुसरे,ता.पाथर्डी यांचे विरुध्द न्याय हक्काचे दृष्टीने चौकशी करणे आवश्यक असलेने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६ च्या तरतुदींनुसार चौकशी करण्याचे निश्चित करण्यांत आलेले आहे. त्यासाठी सदरची चौकशी करणेकामी चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

त्याअर्थी मी, मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर, उक्त नियमाच्या तरतुदींनुसार व मला प्रदान करणेत आलेल्या शक्तींचा वापर करुन श्री.गणेश बाबासाहेब ढाकणे, सेवानिलंबित ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत-सुसरे, ता.पाथर्डी यांचेवर ठेवण्यात आलेल्या दोषारोपाच्या संदर्भात चौकशी करण्याचे आदेश देत आहे. सदरची चौकशी करणेकामी चौकशी अधिकारी म्हणून सहाय्यक आयुक्त (चौकशी), नाशिक विभाग, नाशिक यांची व सादरकर्ता अधिकारी म्हणून जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचेवतीने श्री मधुकर जाधव विस्तार अधिकारी (पंचायत), जिल्ह परिषद अहिल्यानगर यांची नियुक्ती करीत आहे .

नियुक्त सादरकर्ता अधिकारी यांनी प्रत्येक चौकशीचे तारखेस हजर रहावे. त्याचप्रमाणे श्री.गणेश बाबासाहेब ढाकणे, सेवानिलंबित ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत-सुसरे,ता.पाथर्डी यांच्या विरुध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपांचे आक्षेप व पुरावे यांचा सखोल अभ्यास करुन जिल्हा परिषदेची सक्षम प्रकारे बाजू मांडावी. विभागीय चौकशी वेळेत पुर्ण करणे कामी आवश्यक ते सर्व कामकाज नियमाप्रमाणे करावे व होणा-या प्रत्येक सुनावणीस नियुक्त सादरकर्ता अधिकारी यांनी उपस्थित रहावे.

नियुक्त सादरकर्ता अधिकारी यांनी प्रत्येक चौकशीच्या तारखेस हजर रहावे. त्याचप्रमाणे श्री.गणेश बाबासाहेब ढाकणे, सेवानिलंबित ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत-सुसरे,ता.पाथर्डी यांच्या विरुध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपांचे आक्षेप व पुरावे यांचा सखोल अभ्यास करुन जिल्हा परिषदेची सक्षम प्रकारे बाजू मांडावी. विभागीय चौकशी वेळेत पुर्ण करणे कामी आवश्यक ते सर्व कामकाज नियमाप्रमाणे करावे.

विभागीय चौकशी प्रकरणीचे कामकाजात टाळाटाळ करण्याचे गैरवर्तन केल्याचे निदर्शनास आल्यास सादरकर्ता अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल, याची नोंद घ्यावी. या खाते निहाय विभागीय चौकशीस महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम 1964 च्या ब्रियमातील तरतुदी लागू राहतील.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक 202५१०2९०५०2०५ असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 29-10-2026 21:29:28
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

1. सहाय्यक आयुक्त, (चौकशी),
   विभागीय आयुक्त कार्यालय,
   नाशिक विभाग, नाशिक.

2/- सोबत श्री.गणेश बाबासाहेब ढाकणे,सेवानिलंबित ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत-सुसरे, ता.पाथर्डी यांची गैरवर्तनाबाबतचे पत्रव्यवहार संचिका या समवेत जोडली आहे. तरी चौकशी करुन अहवाल इकडेस सादर करावा.

2. श्री मधुकर जाधव, विस्तार अधिकारी (पंचायत), ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर

2/- सादरकर्ता अधिकारी म्हणुन आपली नियुक्ती करण्यात आलेली असुन संदर्भ क्र.५ च्या परिपत्रकाचे सुक्ष्म अवलोकन करुन पुढील नियमोचित कार्यवाही करावी.

3. गटविकास अधिकारी, पंचायत समिती अहिल्यानगर.

2/- सोबतचा आदेश श्री गणेश बाबासाहेब ढाकणे,सेवानिलंबित ग्रामपंचायत अधिकारी यांना बजावून तो मिळालेबाबत दुय्यम प्रतीवर त्यांची तारखेसह स्वाक्षरी घेऊन पोहोच या कार्यालयास सादर करावी.

4. निवड नस्ती.

(स्वाक्षरीत/-)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर